भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६८२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/१०/२०१७

**१) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०१/१०/२०१७ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा व त्याचे शिष्ठमंडळाने गंगाराम देवस्थानाच्या जागेतील हातकुडे हटविण्यासाठी नगर पंचायत लाखनी व मा. जिल्हाधीकारी साहेब भंडारा यांना लेखी निवेदन का दिले या कारणावरुन आरोपीतांनी फिर्यादीचे घरासमोरील आमरोडवर जावुन संगनमत करुन फिर्यादीस व त्याचे पत्नीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २९४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून पाहुन घेण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०१/१०/२०१७ चे १५.०७ वाजता दरम्यान यातील फिर्यादीने आरोपीस स्लॉपचे पाठयावरून अळकले असता आरोपी हीने फिर्यादीस जातीवाचक शिवीगाळ करून अश्लिल शब्दात शिवीगाळ बोलुन धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,५०५,५०६ भांदवि. सहकलम ३(१)(आर)(एस) अ.जा.ज.प्रति अधीनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधीकारी भंडारा श्री जोगदंड पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**३) सरकारी कामात अडथळा निर्माण करुन थापड बुक्यांनी मारपीट केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०१/१०/२०१७ चे १२.०५ ते १२.२० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे राजीव गांधी चौकातुन आपले ताब्यातील एसटी बस क्र. एमएच ४० एन ८५७८ रामटेक येथे घेवुन जात असता यातील दोन अनोळखी इसम बसला हात देवुन थांबविण्याचा ईशारा केला असता फिर्यादीने बस थांबविल्यावर अनोळखी ईसम एसटी बस चालकाचे दरवाज्यातुन बस मध्ये चढुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन थांपडबुक्यांनी मारपीट केले. व सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याने फिर्यादी पंकज हिवराज नाईक वय ३६ वर्ष, रा. राधाकृष्ण वार्ड रामटेक जि. नागपुर यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५३,३३२,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. उबाळे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**४) गैरकायदयाची मंडळी जमवुन वन्य अभयारन्य चौकीला आग लावुन चौकीतील सामान जाळपोळ करुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०१/१०/२०१७ चे १०.०० ते १०.३० वाजता दरम्यान यातील साठवणे नावाचा ईसम हा मोटार सायकल ने कोका वरुन खडकी गावाकडे जात असतांना जंगली डुक्कर आडवा गेल्याने मोटार सायकलचा अपघात होवुन मोटार सायकल चालक मरण पावल्याने यातील आरोपीतांनी मनात रोष बाळगुन गैरकायदयाची मंडळी जमवुन वन्यजिव अभयारण्य कोका चा तपासनी नाक्यावरील मुजुरांना धमकावुन चौकीला आग लावुन चौकातील सामानाची जाळपोळ करुन किंमती ५०,०००/—रु. ची नुकसान केल्याने फिर्यादी आशुतोष गणपत शेळके वय ३२ वर्ष, रा. नेमणुक कोका वन्यजीव अभयारण्य कार्यालय चंद्रपुर यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १४३,४३६,५०६ भांदवि. सहकलम ७(अ)(ब) क्रिमीनल लॉ. अमायमेंट ॲक्ट १९३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. मानकर पो.स्टे कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) शेतातील पाणी घेण्याच्या कारणावरुन भांडण करुन गवत कापण्याच्या विळयाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०१/१०/२०१७ चे १८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी संदीप यशवंत शरणागते वय ३५ वर्ष, रा. उसरला हा आरोपीचे शेतातुन पाणी घेत असतांना यातील आरोपीने फिर्यादीस 'तु माझ्या शेतातुन पाणी का घेतले' असे बोलुन भांडण करुन आपले हातातील गवत कापण्याच्या विळयाने फिर्यादीचे डावे हाताचे मनगटा जवळ मारुन जखमी करुन मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३२४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. म्हैसकर. पो.स्टे आंधळगाव हे करीत आहेत.

**६) अवैध दारू अडयावर धाडी . :–**

दिनांक ०१/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर, आंधळगाव, पवनी व अडयाळ येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून २० लिटर हा.भ. दारू किंमती १०००/–रु, व १०५ लिटर ९८० मिली लिटर देशी/विदेशी बिअर कंमती ३०,८६८ /–रु. असा एकुण किंमती ३१,८६७/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

02.10

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता